# महाराष्ट्र हायस्कूल, कमला कॉलेजला विजेतेपद

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



एकोणीस वर्षांखालील मुलींच्या गटातील विजेता कमला कॉलेजचा संघ.

अर्जुन टाकळकर



सतरा वर्षांखालील गटातील मुलांमधील महाराष्ट्र हायस्कूलचा विजेता संघ.

जिल्हा क्रीडा कार्यालय आणि महापालिका यांच्या वतीने आयोजित शहरस्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात महाराष्ट्र हायस्कूलने, तर १९ वर्षांखालील गटात कमला कॉलेजने विजेतेपद पटकाविले. महाराष्ट्र हायस्कूलने अंतिम सामन्यात सेंट झेविअर्सचा १-०, तर कमला कॉलजने पद्माराजे गर्ल्स कॉलेजचा २-० असा पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली.

अंतिम सामन्यात महाराष्ट्र हायस्कूलकडून कुणाल चव्हाण याने एकमेव विजयी गोल केला. कमला कॉलेजकडून आकांक्षा सूर्यवंशी व समीक्षा पाटील यांनी प्रत्येक एक गोल नोंदविला. विजेत्या व उपविजेत्या संघास मुंबईच्या निसर्ग सामाजिक संस्थेच्या वतीने ऋणमुक्तेश्वर चषक प्रदान करण्यात आला. तर उत्कृष्ट खेळाडू जय कामत (सेंट झेविअर्स) व ऋतुजा सूर्यवंशी (कमला कॉलेज) यांना कै. गोविंद जठार यांच्या स्मृती चषक प्रदान करण्यात आला. नगरसेवक किरण नकाते यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या वेळी सुधीर पाटील, सचिन पांडव, प्रदीप साळोखे प्रमुख उपस्थित होते.

दरम्यान, १९ वर्षांखालील मुलांच्या स्पर्धेत शिवाजी मराठा हायस्कूलने सडनडेथवर विद्यापीठ कनिष्ठ महाविद्यालयाचा पराभव केला. महाराष्ट्र हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयाने छत्रपती शाहू ज्युनिअर कॉलेजवर ३-० असा विजय नोंदविला. विवेकानंद ज्युनिअर कॉलेजने महावीर ज्युनिअर कॉलेजला १-० असे नमविले. चाटे ज्युनिअर कॉलेजने केएमसी ज्युनिअर कॉलेजला टायब्रेकरवर ३-२ असे पराभूत केले. राजाराम ज्युनिअर कॉलेजने डॉ. डी. वाय. पाटील ज्युनिअर कॉलेजला १-० असे नमविले, तर एस. एम. लोहिया ज्युनिअर कॉलेजने न्यू कॉलेजचा टायब्रेकरवर ३-२ असा पराभव केला.

## जठार चषक फुटबॉल स्पर्धा



जय कामत



ऋतुजा सूर्यवंशी

उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्र हायस्कूल ज्युनिअर कॉलेजने शिवाजी मराठा ज्युनिअर कॉलेजचा ३-० असा पराभव केला. विवेकानंद ज्युनिअर कॉलेजने चाटे ज्युनिअर कॉलेजला १-० असे पराभूत केले. न्यू मॉडेल ज्युनिअर कॉलेजने राजाराम ज्युनिअर कॉलेजला २-१ असे पराभूत केले. त्यानंतर एस. एम. लोहिया ज्युनिअर कॉलेजने डी. डी. शिंदे ज्युनिअर कॉलेजला ३-० असे पराभूत करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

18/8/16

Scanned by CamScanner